# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## गृहपाठ

## बी. ए. अर्थशास्त्र

तृतीय वर्ष (सत्र ५ व सत्र ६)

२०१७–१८

प्रती : २००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ५ व सत्र ६ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| पाचवे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| सहावे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

## कृषी अर्थशास्त्र – १ (EC-501)
## सत्र – ५
## प्रकरण क्रमांक १ ते ७

---

**प्र. १. शेती आणि उद्योग यातील फरक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेती आणि उद्योग अर्थव्यवस्थेतील दोन महत्त्वाची क्षेत्रे आहेत. अर्थशास्त्राची मूलतत्त्वे दोन्ही क्षेत्रांना लागू होत असली तरी या दोन्हीमध्ये मोठा फरक असल्याने कृषी अर्थशास्त्राचे स्वरूप वेगळे ठरते.

फरक स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक. भूमीचे महत्त्व, उत्पादनाचे स्वरूप, परावलंबित्व, आर्थिकेतर घटकांचा प्रभाव, मागणीची लवचिकता कमी, उत्पादनाचे नाशवंत स्वरूप, खर्च व उत्पन्नातील अंतर इ.

सारांश.

**प्र. २. भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे सांगा**

**उत्तर – प्रस्तावना –** भारतीय शेतीची दरडोई व दरहेक्टरी उत्पादकता इतर विकसित देशांच्या तुलनेत फारच कमी आढळते.

कारणे – जमीन धारणा पद्धती, लहान आकाराचे क्षेत्र, वाढती लोकसंख्या, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, जुने उत्पादन तंत्र, अपुरा पाणीपुरवठा, शेतमालाची अयोग्य पद्धतीने विक्री, संशोधनाकडे दुर्लक्ष, सरकारची धोरणे इ. मुद्द्यांचे विश्लेषण

सारांश.

**प्र. ३. शेतीमाल विपणनाची कार्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेतकरी व ग्राहक यांच्यामध्ये मोठे अंतर. त्यामुळे शेतमाल विपणनामध्ये अनेक गोष्टींचा समावेश. प्रा. एफर्सनच्या मते– कालावधी व अंतर या दोन्ही संदर्भात शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत शेतीमाल नेण्यामध्ये ज्या क्रिया आवश्यक असतात त्या सर्वांचा समावेश विपणनाच्या कार्यात होतो.

कार्ये – मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रक्रिया, दळणवळण, संग्रह (साठा), वित्तपुरवठा, विक्री, आवेष्टन, जोखीम स्वीकारणे, वितरण इ. कार्यांचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे द्या.**

**अ) जमीन सुधारणांची उद्दिष्टे स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** जमीनविषयक सुधारणांची व्याख्या, अर्थ–स्पष्टीकरण. उद्दिष्टे– शोषणविरहित रचना, सामाजिक न्याय, कसेल त्याची जमीन, शेती क्षेत्राचा विकास, रोजगार वाढ, मध्यस्थांचे उच्चाटन इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप.

**ब) नियंत्रित बाजारपेठेचे फायदे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** नियंत्रित बाजारपेठेची संकल्पना. स्पष्टीकरण. फायदे – शोषणाला पायबंद, शेतीमालाला योग्य दर, वजन–मापातील फसवणुकीस पायबंद, शेतकऱ्यांचे हितरक्षण, साठा करण्यासाठी सुविधा, इतर सोयी, मालाच्या प्रतवारीमुळे योग्य दर, बाजार विषयक माहितीचे प्रसारण इ.

समारोप.

**प्र. ५. टिपा लिहा.**

**अ) शेतमाल किंमत स्थिरीकरणातील अडचणी.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेतमाल किंमतीचे स्थिरीकरण– व्याख्या व स्पष्टीकरण. किंमतीचे स्थिरीकरण आवश्यक आहे; परंतु त्यामध्ये अनेक अडचणी

अडचणी – जास्त उत्पादन असताना येणारी अडचण, कमी उत्पादन असताना येणारी अडचण, किंमत निश्चित करताना येणाऱ्या अडचणी, व्यावहारिक अडचणी, सरकारचे धोरण इ.

समारोप.

**ब) कृषी पतपुरवठ्याचे वर्गीकरण.**

**उत्तर – प्रस्तावना –** इतर उद्योगांप्रमाणेच शेतीसाठी पतपुरवठ्याची आवश्यकता असते. शेती व्यवसायाचे स्वरूप वेगळे असल्याने शेती पतपुरवठ्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

वर्गीकरण – दोन प्रकारात – अ) मुदतीनुसार –१) अल्प मुदत कर्ज २) मध्यम मुदत कर्ज ३) दीर्घ मुदत कर्ज. ब) कर्जाच्या उपयोगानुसार १) उत्पादक कर्ज २) अनुत्पादक कर्ज. या प्रकारांचे उदा. सह स्पष्टीकरण.

समारोप.

---

## कृषी अर्थशास्त्र – २ (EC-601)
## सत्र – ६
## प्रकरण क्रमांक ८ ते १४

---

**प्र. १. जलसिंचनाचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भारत कृषीप्रधान अर्थव्यवस्था. शेतीसाठी बारमाही पाणीपुरवठा अत्यावश्यक याबाबतचे विश्लेषण. महत्त्व – अनियमित पाऊस, विविध पिकांची गरज, सखोल शेती, उत्पादकतेत वाढ, रोजगारात वाढ, नैसर्गिक असंतुलनावर उपाय, शेतीचे व्यापारीकरण, इतर कामासाठी शेतीचा वापर.

समारोप.

**प्र. २. शेतमजुराच्या दारिद्र्यावस्थेची कारणे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेतमजुराची व्याख्या व स्पष्टीकरण, शेतमजुरांची अवस्था अत्यंत हलाखीची.

कारणे – हंगामी बेकारी, सामाजिक दर्जा, असंघटितपणा, मजुरीचा कमी दर, पर्यायी रोजगाराचा अभाव, ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास, सतत वाढणारी लोकसंख्या, कर्जबाजारीपणा, निरक्षरता व अज्ञान, मोठ्या शेतकऱ्यांचा विरोध इ.

समारोप.

**प्र. ३. जमिनीची धूप होण्याची कारणे व परिणाम स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** जमिनीची धूप– व्याख्या व स्पष्टीकरण. कारणे – जंगलतोड, कुरणांचा नाश, लागवडीची झूम पद्धत, अशास्त्रीय लागवड इ.

परिणाम – कमी पर्जन्यमान, पाण्याची घटती पातळी, रेताड जमीन, सुपीक स्तराचा नाश, राहणीमानात घट इ.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे द्या.**

**अ) हरितक्रांतीतील त्रुटी स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** हरितक्रांतीचा अर्थ– स्पष्टीकरण. हरितक्रांतीचे अनेक चांगले परिणाम दिसून येत होते; परंतु काही त्रुटी– भारतीय शेतीत भांडवली शेती पद्धतीची वाढ, शेतीतील संरचनात्मक सुधारणांकडे दुर्लक्ष, उत्पन्नातील तफावत वाढली, रोजगारावरील परिणाम इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

समारोप.

**ब) उपविभाजन व अपखंडनाची कारणे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** उपविभाजन व अपखंडनाच्या व्याख्या–अर्थ, स्पष्टीकरण

कारणे – लोकसंख्येचा भार, रोजगार संधीची कमतरता, वारसाहक्काचे कायदे, कौटुंबिक विभागणी, ग्रामोद्योग नष्ट, कर्जबाजारीपणा इ.

समारोप.

**प्र. ५. टिपा लिहा.**

**अ) शेतीच्या यांत्रिकीकरणाचे फायदे.**

**उत्तर – प्रस्तावना –** शेतीच्या यांत्रिकीकरणाची व्याख्या व स्पष्टीकरण.

फायदे – कामाची गती वाढते, उत्पादन खर्चात घट, मोठ्या प्रमाणावरील शेती, जनावरांवरील खर्चात घट, रोजगार संधीत वाढ, आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत.

समारोप.

**ब) बहुपीक पद्धती**

**उत्तर – प्रस्तावना –** बहुपीक पद्धती संकल्पनेबाबत स्पष्टीकरण. बहुपीक पद्धतीसाठी आवश्यक घटक – पाण्याची सोय, पीक प्रकार, सुधारित मशागत, बाजारपेठ इ. याशिवाय योग्यप्रकारच्या पिकांची निवड याबाबतचे विश्लेषण.

समारोप.

# श्रमाचे अर्थशास्त्र (EDSE-501)

## सत्र – ५

**प्र. १. श्रमाची व्याख्या सांगून, श्रमाची मागणी निश्चित करणारे घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** श्रमाच्या अनेक व्याख्या. त्यापैकी कोणतीही एक व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

वस्तूंचे उत्पादन करताना श्रम हा आवश्यक घटक असतो. त्यामुळे सर्वच उत्पादन क्षेत्रात श्रमाची मागणी केली जाते. श्रमाची मागणी प्रामुख्याने पुढील घटकांवर अवलंबून असते. घटक – श्रमाच्या सीमांत उत्पादकतेचे मूल्य, श्रमाचा खर्च, तांत्रिक प्रगतीचा प्रभाव, उत्पादनाचे तंत्र, हंगामी परिणाम, भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता, वस्तू व सेवांची मागणी, आर्थिक चढ–उताराचा परिणाम इ.

समारोप.

**प्र. २. श्रमाची उत्पादकता म्हणजे काय? विकसनशील देशात श्रमाची उत्पादकता कमी असण्याची कारणे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** श्रम उत्पादकतेची व्याख्या व तिचे स्पष्टीकरण.

विकसनशील देशात श्रमाची उत्पादकता बहुतेक कमीच आढळते. कारणे – शिक्षणाचा अभाव, कामगार अनुपस्थिती, उत्पन्नाचे इतर मार्ग, कमी उत्पन्न, व्यसनाधीनता, नैसर्गिक कारणे, तणावपूर्ण औद्योगिक संबंध, वेतन व बोनस, सुट्या व कामाचे तास, उद्योगातील वातावरण, कामगार कपात इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

समारोप.

**प्र. ३. भारतातील कामगार संघटनांमधील दोष स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** कामगार संघटनेबाबत थोडक्यात स्पष्टीकरण

भारतीय कामगार संघटनांमध्ये अनेक दोष – संघटनेचा लहान आकार, अपुरा निधी, अपुरी सभासद संख्या, कामगारांची उदासीनता, बाह्य नेतृत्व, राजकीय पक्षांचा प्रभाव, मर्यादित कार्यक्षेत्रात वाढ, एकीचा अभाव, एकाच उद्योगात अनेक संघटना, अल्प सौदाशक्ती इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) किमान वेतन ठरविताना येणाऱ्या समस्या स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** किमान वेतन संकल्पनेचे स्पष्टीकरण. किमान वेतन निश्चित करताना निर्माण होणाऱ्या समस्या – वेगवेगळ्या उद्योगात वेगवेगळे किमान वेतन, लिंग भेदानुसार वेगवेगळे किमान वेतन, कुटुंबाचा आकार, राहणीमानाचा दर्जा ठरविणे, किमान वेतनाची अंमलबजावणी इ. मुद्द्यांचे उदा. स्पष्टीकरण आवश्यक.

समारोप.

**ब) श्रमाच्या उत्पादकतेवर प्रभाव पाडणारे घटक सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** श्रम उत्पादकतेची व्याख्या – स्पष्टीकरण. श्रम उत्पादकतेवर अनेक घटकांचा प्रभाव.

घटक – अ) सर्वसाधारण घटक – तांत्रिक घटक, वित्तीय घटक, श्रम घटक, व्यवस्थापकीय घटक ब) विशेष घटक – नैसर्गिक घटक, सरकारी धोरण, सामाजिक घटक इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ५. टिपा लिहा.**

**अ) श्रमाच्या गतिशीलतेवर प्रभाव पाडणारे घटक.**

**उत्तर – प्रस्तावना –** श्रमाची गतिशीलता. व्याख्या – स्पष्टीकरण, अनेक घटकांचा प्रभाव.

घटक – वेतनदरातील भिन्नता, वेळ व पैशाच्या स्वरूपातील खर्च, प्रशिक्षणाची आवश्यकता, कामगारांचे वय, महिला कामगार, शैक्षणिक दर्जा, रोजगार संधीची माहिती इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप.

**ब) कामगार कल्याणाची आवश्यकता.**

**उत्तर – प्रस्तावना –** कामगार कल्याण संकल्पना–स्पष्टीकरण, आवश्यकता स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

औद्योगिक संबंधात सुधारणा, कामगार कार्यक्षमतेत वाढ, राहणीमानात सुधारणा, अनुपस्थितीचे प्रमाण घटते, वर्गसंघर्षात घट, कामगारांचे मनोबल वाढते, कामगारांचा सर्वांगीण विकास, सामाजिक खर्चात घट इ.

समारोप.

---

## आर्थिक विचारांचा इतिहास भाग – १ (EC-502)

## सत्र – ५

## प्रकरण क्रमांक १ ते ८

---

**प्र. १. व्यापारवाद म्हणजे काय? व्यापारवादाच्या उदयाची कारणे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** व्यापारवादाची व्याख्या – अर्थ–स्पष्टीकरण .

कोणतीही विचारसरणी विशिष्ट परिस्थितीत निर्माण होत असते. व्यापारवादाच्या उदयावेळी जी परिस्थिती निर्माण झालेली होती, ती कारणे पुढीलप्रमाणे अ) आर्थिक घटक – सरंजामशाहीचा अस्त, विनिमयामध्ये पैशाचा मोठा वापर, नवीन व्यापारी संस्थांचा उदय, बँक व्यवसायाचा उदय व विकास ब) राजकीय घटक क) धार्मिक घटक ड) सांस्कृतिक घटक इ) शास्त्रीय व तांत्रिक घटक इ.

समारोप.

**प्र. २. निसर्गवादाच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** निसर्गवादाचा अर्थ–स्पष्टीकरण.

तत्कालीन फ्रान्समध्ये निसर्गवादी विचारांना पोषक अशा अनेक घटना घडून आल्या. या घटनाच निसर्गवादाच्या उदयाची कारणे आहेत.

कारण – फ्रान्समधील तत्कालीन परिस्थिती, शेतीकडे दुर्लक्ष, इंग्लंडमधील नवविचारांचा प्रभाव इ.

समारोप

**प्र. ३. रिकार्डोचा खंड सिद्धांत स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** रिकार्डोने तत्कालीन परिस्थितीला अनुसरून आपल्या सिद्धांताची मांडणी केलेली आहे. त्या परिस्थितीचे थोडक्यात वर्णन.

खंडाची व्याख्या – सिद्धांताची गृहीते– स्पष्टीकरण – आकृती, सिद्धांतावर केली जाणारी टीका.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) स्मिथ यांचे श्रमविभागणी विषयक विचार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** स्मिथच्या आर्थिक विचारांची सुरुवातच श्रम विभागणीपासून झालेली आहे. श्रम विभागणीबाबत सविस्तर विचार प्रथम स्मिथ यांनीच केलेला होता.

श्रमविभागणी बाबत स्मिथच्या विचारांचे स्पष्टीकरण. टाचणी उत्पादनाचे उदा. सह विश्लेषण, औद्योगिक क्षेत्रामध्ये या तत्त्वाचे स्वागत व स्वीकार.

समारोप.

**ब) माल्थसच्या सिद्धांताची रूपरेषा स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** जगण्यासाठी अन्न. स्त्री–पुरुषातील नैसर्गिक आकर्षण कायम. प्रजोत्पादन वाढते. अन्नधान्य कमी पडते. त्यातून उपासमार, दारिद्र्य .

सिद्धांतामध्ये तीन महत्त्वाचे मुद्दे – १) लोकसंख्या, भूमिती श्रेणीने वाढते. २) अन्नधान्य गणिती श्रेणीने वाढते. ३) २५ वर्षांत लोकसंख्या जास्त व अन्नधान्य कमी अशी अवस्था. याबाबतचे विश्लेषण. मानवाने लोकसंख्या नियंत्रित न केल्यास निसर्गाकडून लोकसंख्या नियंत्रण. त्यासाठी माल्थसने सुचिवलेल्या उपायांचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ५. टीपा लिहा.**

**अ) मार्शलचे अर्थशास्त्राबाबतचे विचार**

**प्रस्तावना –** नवसनातनवादी विचारांच्या अर्थशास्त्रज्ञात मार्शलचे विचार प्रभावी. नवसनातनवादाचा प्रणेता. बदलत्या काळाशी सुसंगत विचार.

अर्थशास्त्राची नवी व्याख्या – तिचे विश्लेषण. मानवी कल्याणाचा विचार. मूल्यविषयक विचाराचे विश्लेषण. उपयोगिता हा घटक मागणीवर आणि उत्पादनखर्च हा घटक पुरवठ्या प्रभावी परिणाम करतात. मूल्य

निश्चितीमध्ये कालखंड हा घटकही महत्त्वाचा असतो. याबाबतचे विश्लेषण.

समारोप.

**ब) 'से'चा बाजारपेठेचा नियम**

**उत्तर – प्रस्तावना –** से यांचे आर्थिक विचार फार प्रभावी नव्हते; परंतु त्यांनी मांडलेला बाजारपेठेचा नियम हा सिद्धांत मात्र एक महत्त्वाचे योगदान मानले जाते.

प्रत्येक वस्तूचा पुरवठा आपली स्वतःची मागणी निर्माण करतो. हा बाजारपेठेचा नियम. या नियमाचे स्पष्टीकरण. सिद्धांतावरून निघणारे निष्कर्ष व थोडक्यात मूल्यमापन.

समारोप.

---

## आर्थिक विचारांचा इतिहास भाग – २ (EC-602)

## सत्र – ६

## प्रकरण क्रमांक ९ ते १७

**प्र. १. मार्क्सचा मूल्य सिद्धांत स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** मार्क्सने मूल्य सिद्धांत मांडला. पण केवळ वस्तूची किंमत कशी ठरते एवढ्या मर्यादित उद्देश त्यामागे नव्हता याबाबतचे विश्लेषण

मार्क्सने पुरवठा व उत्पादन खर्च या संदर्भातच मूल्यविषयक विचार मांडले. मानवी श्रम, वस्तूच्या मूल्याचा पाया होय. वस्तू निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून वस्तूचे मूल्य ठरते.

वस्तूला दोन प्रकारचे मूल्य – १) उपभोगमूल्य व २) विनिमय मूल्य.

या सर्व मूल्यांचे उदा. सह स्पष्टीकरण, विनिमयमूल्य निश्चित करण्याची पद्धती व सिद्धांतावरील टीका.

समारोप.

**प्र. २. मिल यांचे विभाजन विषयक विचार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** विभाजन मानवनिर्मित व तात्पुरते असते म्हणून बदलता येते. संपत्ती व उत्पादन वाटप याबाबत समाजाचा निर्णय महत्त्वाचा.

विभाजन विषयक विचारात मिलने उत्पादक घटकांचे मोबदले कसे ठरतात, याचे केलेले विवेचन. १) वेतन २) नफा ३) खंड या संदर्भात स्पष्टीकरण.

समारोप.

**प्र. ३. कौटिल्याचे आर्थिक विचार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** कौटिल्य विषयक माहिती.

आर्थिक विचार स्पष्ट करताना– मानवी जीवन संपत्तीवर अवलंबून, संपत्तीचे उगमस्थान पृथ्वी आहे, पृथ्वीचे संरक्षण करूनच संपत्ती वाढू शकते. याबाबत थोडक्यात भाष्य.

आर्थिक विचार स्पष्ट करताना – शेती, व्यापार, याबाबतचे विचार, सरकारचे उत्पन्न व खर्च,

राज्यव्यवस्था या बाबत विचार स्पष्ट करणे आवश्यक.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) लिस्ट यांचा उत्क्रांतीविषयक सिद्धांत स्पष्ट करा**

**उत्तर – प्रस्तावना –** लिस्टच्या विवेचनामध्ये आर्थिक विकासाच्या विविध अवस्थांचे विश्लेषण. मागास राष्ट्र विकसित होताना या अवस्थांमधून ते जात असते.

लिस्ट यांनी सांगितलेल्या पाच अवस्था व त्याचे थोडक्यात विश्लेषण. टीकात्मक परीक्षण – थोडक्यात.

समारोप.

**ब) आर्थिक निस्सारणाचे स्वरुप स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक निस्सारणाबाबत थोडक्यात स्पष्टीकरण.

स्वरूप स्पष्ट करताना – गृहखर्च, युद्ध खर्च, निर्यात, कर्ज व त्यावरील व्याज, विक्रीवरील नफा, अधिकाऱ्यांनी मायदेशी पाठवलेली संपत्ती, सेवा खर्च, इतर कारणे याबाबतचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ५. टिपा लिहा.**

**अ) नवप्रवर्तकाचे हेतू व नवप्रवर्तनासाठी आवश्यक बाबी**

**उत्तर – प्रस्तावना –** शुंपीटर यांनी भांडवलशाहीत नवप्रवर्तक व नवप्रवर्तनाची क्रिया यांना महत्त्व दिलेले आहे. याबाबत स्पष्टीकरण.

नवप्रवर्तकाचे हेतू– नफा कमविणे, स्पर्धा, श्रेष्ठत्व, आनंद व समाधान इ. चे विश्लेषण. नवप्रवर्तनासाठी आवश्यक बाबी – सरकारी धोरण, समतोल अर्थव्यवस्था, भांडवल उपलब्धता इ. चे विश्लेषण.

समारोप.

**ब) गांधीजींचे आर्थिक विचार**

**उत्तर – प्रस्तावना –** गांधीजींबाबत थोडक्यात माहिती.

आर्थिक विचार स्पष्ट करताना – मानवी मूल्य, अहिंसा, साधेपणा, विकेंद्रीकरण, बेकारी, सर्वोदय योजना, अन्नधान्य व लोकसंख्या, विश्वस्त संकल्पना इ. मुद्द्यांचे थोडक्यात विश्लेषण.

समारोप.

---

# विविध अर्थव्यवस्था (EDSE-603)

## सत्र – ६

---

**प्र. १. अर्थव्यवस्थांची कार्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** अर्थव्यवस्थेची व्याख्या व स्पष्टीकरण.

आर्थिक समस्या सोडविण्यासाठीच समाज विशिष्ट अर्थव्यवस्थेचा स्वीकार करतो. त्यामुळे प्रामुख्याने पुढील कार्ये अर्थव्यवस्थेला करावी लागतात. कार्ये – कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे, किती प्रमाणात उत्पादन करावयाचे, उत्पादन कसे करावयाचे, किती प्रमाणात उत्पादन करावयाचे, उत्पादन कसे करावयाचे, उत्पादनाचे विभाजन कसे करावयाचे, साधनांचा पूर्ण वापर होण्यासाठी प्रयत्न करणे, अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढविणे, संघटना व साधने उपलब्ध करून देणे, प्रेरक शक्ती निर्माण करणे, विकास आणि स्थैर्य प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करणे इ.

समारोप.

**प्र. २. आधुनिक भांडवलशाहीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पूर्वीच्या भांडवलशाहीवर, जागतिक पातळीवर बदललेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक वातावरणाचा परिणाम झाल्यामुळे भांडवलशाहीच्या विचारसरणीत आणि संस्थांमध्ये अनेक बदल झाले. जगातील विविध देशांत सध्या जी भांडवलशाही अस्तित्वात आहे तिलाच आधुनिक भांडवलशाही म्हणतात.

**वैशिष्ट्ये –** स्पर्धेच्या स्वरूपात बदल, बाजार यंत्रणेच्या स्वरूपात बदल, औद्योगिक संघटनांच्या स्वरूपात बदल, व्यवस्थापनातील क्रांती, कामगार संघटनांची निर्मिती, आर्थिक स्थैर्याचा अभाव, तंत्रज्ञानाचा वापर, वर्गरचनेत बदल, भाववाढ, शासनाचा हस्तक्षेप इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ३. मिश्र अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** मिश्र अर्थव्यवस्थेची व्याख्या व स्पष्टीकरण.

**वैशिष्ट्ये –** खासगी मालमत्ता, व्यवसाय स्वातंत्र्य, उपभोग स्वातंत्र्य, बाजारयंत्रणेचा वापर, नफ्याची प्रेरणा, उत्पन्नाचे न्याय्य वाटप, आर्थिक नियोजन, सार्वजनिक क्षेत्र, सरकारी यंत्रणेचा वाढता हस्तक्षेप इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) निर्हस्तक्षेपाची संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** नव्याने उदयास आलेल्या भांडवलशाहीत सरकारी हस्तक्षेप अत्यंत कमी होता. याबाबतचे विश्लेषण.

ॲडम स्मिथच्या ग्रंथामध्ये निर्हस्तक्षेप हा महत्त्वाचा भाग होता. स्मिथने व्यापारवादास विरोध व मुक्त स्पर्धा युक्त, निर्हस्तक्षेपी भांडवलशाहीचा जोरदार पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्तीला आपले हित समजते व त्यामधून आपोआप संपूर्ण समाजाचे हित साध्य होते. याबाबतचे विश्लेषण.

समारोप.

**ब) समाजवादाची कार्यपद्धती स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** समाजवादाची व्याख्या व स्पष्टीकरण.

समाजवादाची वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती तिचे भांडवलशाहीहून असणारे वेगळेपण सिद्ध करते. ही कार्यपद्धती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करणे आवश्यक. **कार्यपद्धती –** सत्तेचे केंद्रीकरण एकाच पक्षाकडे, उत्पादन साधनांवर समाजाची मालकी, केंद्रीय नियोजन, किंमत यंत्रणा महत्त्वाची नसते, सामाजिक न्यायानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन इ.

समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा.**

**अ) मार्क्सचा मूल्यसिद्धांत**

**उत्तर – प्रस्तावना –** मार्क्सने सिद्धांत मांडला पण केवळ वस्तूची किंमत कशी ठरते, एवढा मर्यादित उद्देश त्यामागे नव्हता. याबाबतचे विश्लेषण.

मार्क्सने पुरवठा व उत्पादन खर्च या संदर्भातच मूल्यविषयक विचार मांडले. मानवी श्रम वस्तूच्या मूल्याचा पाया होय. वस्तू निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून वस्तूचे मूल्य ठरते.

वस्तूला दोन प्रकारचे मूल्य – १) उपभोग मूल्य व २) विनिमय मूल्य

या सर्व मूल्यांचे उदा. सह स्पष्टीकरण, विनिमय मूल्य निश्चित करण्याची पद्धती व सिद्धांतावरील टीका.

समारोप.

**ब) खासगी क्षेत्राचे कार्य**

**उत्तर – प्रस्तावना –** खासगी क्षेत्राबाबतचे विश्लेषण.

कार्य स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे विश्लेषण.

कार्य – विकास कार्यात महत्त्वाची भूमिका, आधुनिक स्वरूपाचे विस्तृत औद्योगिक क्षेत्र, लघु उद्योगात व्यक्तीला प्रोत्साहन, शेती व्यापार क्षेत्राचा मोठा आकार, राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती, रोजगार वाढीस हातभार इ. मुद्द्यांचे विश्लेषण

समारोप.

***